MHSN050018822022

**नियमित दिवाणी दावा क्र.२९९/२०२२ मधील नि.क्र.६४ खालील आदेश**

(बाळासाहेब मधाळे वि. विशाल मधाळे, वगैरे)

प्रस्तूतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेशक्रम VI, नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांचे अर्जातील कथन असे की, वादी यांनी प्रस्तूत दावा प्रतिवादी यांचेविरुध्द दावा मिळकतीचे खरेदीपत्र होऊन मिळणेकरिता व निरंतर ताकीदीकरिता दाखल केला आहे. वादी यांना दावाचे कामी काही आवश्यक मजकूर समाविष्ट करणे तसेच दाव्यातील काही मजकूर वगळे आवश्यक आहे. वादी यांना प्रतिवादी यांनी दिनांक ०५/०४/२०२१ रोजी दावा मिळकतीचे खरेदीपत्र करुन देणेबाबतचे जे करारपत्र केले आहे त्याअनुषंगाने दावा कलम १ नंतर अर्जात नमूद केलेप्रमाणे दावा कलम १अ नमूद करणे, तसेच दावा कलम २, ३ व ४ मधील मजकूरास काट मारुन तो दाव्यातून वगळणे, तसेच दावा कलम ५ पासून कलम १८ पर्यंत २ ते १५ असा पॅरा नमूद करणे, तसेच दावा कलम ७ मध्ये ओळ क्र.६ मधील नोटीस या शब्दापुढे दिनांक १८/०१/२०२१ रोजी असा मजकूर नमूद करणेस, तसेच कलम ८ मधील मजकूर कलम ७ मध्ये समाविष्ट करणे, तसेच दावा कलम ११ मध्ये ओळ क्र.७ नंतर अर्जात नमूद केल्याप्रमाणे दावा मिळकतीमध्ये आर्थिक गुंतवणूक करुन बांधकाम केलेबाबतचा मजकूर नमूद करणे, तसेच दावा कलम १२ नंतर वेगळा परिच्छेद करुन त्यामध्ये अर्जात नमूद केल्याप्रमाणे दावा मिळकतीचे खरेदीपत्र होऊन मिळणेबाबत अथवा र.रु.१४,५०,०००/– वसूल होऊन मिळणेबाबतचा मजकूर, तसेच दावा कलम १७ मधील मजकूरास काट मारुन त्याठिकाणी दावा मिळकतीच्या मुल्यांकनाबाबत व त्याअनुषंगाने मुद्रांक शुल्काबाबतचा मजकूर नमूद करणे, तसेच विनंती कलम १८ मध्ये

अर्जात नमूद केल्याप्रमाणे पोट कलम ड१ नमूद करणे, इ. प्रस्तूत अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्त्या होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. सदर दुरुस्त्यांमुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही, त्यामुळे ती मंजूर होऊन मिळावी, अशी विनंती वादी यांनी केली आहे.

०३. प्रतिवादींनी सदर अर्ज नि.क्र.६४ वरच त्यांचे म्हणणे दाखल करुन त्यास विरोध दर्शवून, प्रस्तूत अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा, अशी विनंती त्यांनी याद्वारे केली आहे.

०४. प्रस्तूत अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांच्या विद्वान विधिज्ञांनी सदरच्या दुरुस्तीने दाव्याचे कोणतेही स्वरुप बदलणार नाही, त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही, असा युक्तीवाद करुन, सदरचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली. याउलट प्रतिवादी यांच्या विद्वान विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, वादी यांनी सूचवलेली दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल होणार आहे. त्यामुळे सदरची दुरुस्ती मंजूर करता येणार नाही. सबब, प्रस्तूत अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी प्रस्तूतचा दावा हा प्रतिवादींविरुध्द करारपत्राप्रमाणे खरेदीपत्र होऊन मिळण्याकरिता, निरंतर ताकीद व जाहीर ज्ञापनाकरिता दाखल केला आहे. प्रस्तूत अर्जातील कथनांचे अवलोकन केले असता, वादी यांनी दाव्यात सूचवलेली दुरुस्ती ही वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान झालेल्या व दावा मिळकतीशी संबंधीत असलेल्या करारपत्राच्या अनुषंगाने व त्यामध्ये झालेल्या बांधकामाच्या अनुषंगाने अधिक स्पष्टीकरण देणारी, तसेच त्या अनुषंगाने दाव्याची आकारणी व विनंती मध्ये दुरुस्तीबाबत दिसून येत आहे. महत्वाचे येथे नमूद करावे वाटते की, दाव्याची संपरीक्षा सुरु होण्यापुर्वी दुरुस्तीचे अर्ज

उदारपणे मंजूर करणे अपेक्षीत असते. प्रस्तूत दाव्यात अद्याप मुद्दे निश्चीत झालेले नाहीत, तसेच दाव्याची संपरीक्षा देखील सुरु झालेली नाही. वादी यांनी फेरिस्त नि.क्र.४ खाली दिनांक ०५/०४/२०२१ रोजीचे वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान झालेले खरेदीपुर्व करारपत्र दाखल केले आहे. वादी यांनी दाव्यामध्ये सुचवलेली दुरुस्ती ही सदर खरेदीपुर्व करारपत्राबाबत व त्यासंबंधीच्या अनुषांगीक दुरुस्तीबाबत असल्याचे दिसून येते. सदरची दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याचे मूळ स्वरुप बदलणार नाही. याउलट सदरची दुरुस्ती मंजूर न केल्यास प्रस्तूत दावा मिळकतीबाबत नव्याने प्रकरणे दाखल होऊन दाव्यांची बहुविधता होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. केवळ प्रस्तूतची दुरुस्ती मंजूर केली म्हणजे ती शाबीत झाली असे होत नाही. याउपर, दाव्यातील कथने शाबीत करण्याचा भार हा सदर कथन करणाऱ्या पक्षकारांवरच असतो. सबब, उपरोक्त चर्चेवरुन प्रस्तूतचा अर्ज मंजूर करणे न्यायाचे होणार आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

## आ दे श

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी संबंधीत दुरुस्ती सदर आदेश तारखेपासून १४ दिवसांचे आत करुन, दावा दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३. वादी यांनी पुढील तारखेपर्यंत दुरुस्त दाव्याप्रमाणे योग्य ती कोर्ट फी जमा करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by THAKUR PRADEEPSINGH
Date: 2024.06.21 17:42:44 +0530

इस्लामपूर. **(प्रदिपसिंह पृ. ठाकूर)**

दिनांक २१/०६/२०२४. ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, इस्लामपूर.

**- : <u>CERTIFICATE</u> : -**

I affirm that the contents of this P.D.F. file, order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Sagar Anil Kate |
| Court Name | :- | 3rd Jt. Civil Judge Jr. Dn., Islampur. |
| Date of decision | :- | 21/06/2024. |
| Order signed by PO. on | :- | 21/06/2024. |
| Order uploaded on | :- | 21/06/2024. |